**शासकीय वाहन चालकांना देण्यात**
**येणा-या अतिकालिक भत्त्यामध्ये वाढ.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**

शासन निर्णय, क्रमांक : अकाभ-१३११/प्र.क्र.९/सेवा-६,
मंत्रालय, मुंबई -४०००३२, दिनांक : ९ सप्टेंबर, २०११.

पहा - १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक - जीसीएस-१३८०/सीआर ११११/एसईआर-९, दिनांक २६ एप्रिल, १९८२.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक - अकाभ-१३९०/सीआर ३४/एसईआर-९, दिनांक १८ ऑक्टोबर, १९९१.
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक- अकाभ-१३९३/१०१/सेवा-९, दिनांक २९ मार्च, १९९५.
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक- अकाभ-१३९५/१७/सेवा-९, दिनांक ९ नोव्हेंबर, १९९५.
५) शासन निर्णय, वित्त विभाग,क्रमांक-अकाभ-१३०४/प्र.क्र.१८/सेवा-८, दिनांक१६ ऑगस्ट,२००४

**<u>शासन निर्णय</u>**

सध्या, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक :अकाभ-१३०४/प्र.क्र.१८/सेवा-८, दिनांक १६ ऑगस्ट, २००४ नुसार शासनाचे विविध विभाग व त्याखालील निरनिराळया कार्यालयातील वाहन चालकांना विहित ९ तासांच्या कामाच्या वेळेपेक्षा जास्त वेळ काम केल्यास खालील शर्तीच्या अधीन राहून रु.२०/- प्रति तास या दराने अतिकालिक भत्ता देण्यात येतो.

१. कामाच्या दिवशी ९ तासापेक्षा जास्त काम केल्यास (भोजन समय धरुन) आणि रविवार व सुट्टीच्या दिवशी सुध्दा काम केल्यास दर तासाला रु.२०/- (अर्धा तास किंवा जास्त काम केल्यास तो पूर्ण तास धरण्यात येईल.)

२. वाहन चालकास एका महिन्यात मिळणारी अतिकालिक भत्त्याची एकूण रक्कम त्याच्या एकूण पगाराच्या (Salary) ५०% पेक्षा जास्त असू नये.

२. वाहन चालकांना मिळणा-या अतिकालिक भत्त्याच्या वर नमूद केलेल्या प्रचलित दरामध्ये वाढ करण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता असे आदेश देत आहे की, वाहन चालकांना देण्यात येणा-या अतिकालिक भत्त्याचा सध्याचा रु.२०/- प्रति तास हा दर पुर्वीच्याच वर नमूद केलेल्या शर्तीच्या अधिन राहून रु.४०/- (रुपये चाळीस मात्र) प्रति तास असा सुधारित करण्यात यावा.

३. वाहन चालकांना सुधारित दराप्रमाणे अतिकालिक भत्ता मंजूर करण्याबाबतचे अधिकार पुर्वीप्रमाणेच वाहन चालक ज्यांचे नियंत्रणाखाली काम करतात त्या विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना राहतील.

४. हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

५. सुधारित दराप्रमाणे येणारा खर्च संबंधित विभागाच्या/कार्यालयाच्या त्या त्या लेखाशिर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध

कृ.मा.प.

रोटा/एच-१९११[८०००+५०-९-२०११]-१

करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०११०९०९११६६५७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( स.अ.मु.नकवी )
**शासनाचे उप सचिव.**

प्रत,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ) -१, महाराष्ट्र, मुंबई (८० प्रती),
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ) -२,महाराष्ट्र, नागपूर (६०प्रती)
महालेखापाल (लेखापरीक्षा ) -१, महाराष्ट्र, मुंबई (८० प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा ) -२, महाराष्ट्र, नागपूर (६० प्रती),
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई ( ५ प्रती )
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई ( ४० प्रती )
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन,वाशी,नवी मुंबई ( १० प्रती )
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई ( १० प्रती )
विधानमंडळाचे सदस्य
राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे सचिव
उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
* प्रबंधक, उच्च न्यायालय, (मूळ शाखा), मुंबई
* प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपिल शाखा), मुंबई
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
* मुख्य माहिती आयुक्त, मुंबई
* आयुक्त राज्य माहिती आयोग ( सर्व)
* सचिव, राज्य निवडणूक आयोग,नवीन प्रशासकीय भवन, मुंबई
ग्रंथपाल,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन मुंबई ( २५ प्रती )
मंत्रालयातील सर्व विभाग
मंत्रालयाच्या निरनिराळया विभागांच्या अधीनस्त सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख
सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर ( १० प्रती ),
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी (१० प्रती )
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला, (१० प्रती )
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा- रत्नागिरी (१० प्रती )
कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर.
कुलसचिव डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे, जिल्हा - रायगड.
बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई - १ ( ५ प्रती )
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश , सी. डी. ओ. बॅरेक नं.-१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉइंट, मुंबई-२० (५ प्रती )
भारतीय कम्युनिष्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस. व्ही. पटेल रोड, मुंबई-४ (५ प्रती )
भारतीय कम्युनिष्ट पार्टी, ( मार्क्सवादी ) महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोबल मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३ ( ५ प्रती )
इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय)समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई -२५ ( ५ प्रती )
नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई - २१ (५ प्रती )
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर , मुंबई -२८ (५ प्रती )
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती - सेवा-६

*पत्राद्वारे

---